अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १३ जून २०२४ । वर्ष : २२ वे अंक : २५४ वा किंमत : ५ रुपये पाने १२

## भारताची विजयाची हॅटट्रिक; अमेरिकेचा केला पराभव

**न्यूयॉर्क** : अमेरिकेनं भारतापुढं विजयासाठी १११ धावांचं आव्हान ठेवलं होतं. भारतानं सूर्यकुमार यादवच्या अर्धशतकाच्या जोरावर ८ विकेटनं विजय मिळवला. या विजयासह भारतानं वर्ल्ड कपमध्ये सुपर ८ मध्ये स्थान निश्चित केलं.

सूर्यकुमार यादवनं ५० धावा केल्या. तर, शिवम दुबे यानं देखील त्याला ३१ धावा करत साथ दिली. रिषभ पंतनं १८ धावा केल्या. आजच्या मॅचमध्ये अर्शदीप सिंग आणि अमेरिकेच्या सौरभ नेत्रावळकरची गोलंदाजी लक्षात राहिली. अर्शदीप सिंगनं अमेरिकेच्या चार विकेट घेतल्या. तर, सौरभ नेत्रावळकरनं रोहित शर्मा आणि विराट कोहलीला बाद केलं. टीम इंडियाचा आक्रमक फलंदाज सूर्यकुमार यादवनं मोक्याच्या क्षणी दमदार कामगिरी केली. सूर्यकुमार यादवनं ५० धावा केल्या. सूर्यकुमार यादवनं शिवम दुबेच्या साथीनं विजयापर्यंत पोहोचवलं. त्यापूर्वी अर्शदीप सिंगनं अमेरिकेच्या चार विकेट घेतल्या. भारतानं मॅच जिंकली, सुपर ८ मध्ये प्रवेश केला पण शाबास अमेरिका असं म्हणायला हवं, असं क्रिकेट समीक्षक सुनंदन लेले म्हणाले. भारताला अमेरिकेनं झुंजवलं ते पाहायला मजा आली, असं त्यांनी म्हटलं. अर्शदीपनं पहिल्या ओव्हरमध्ये दोन विकेट घेतल्या.




# झुडपांना धरुन दोघांनी जीव वाचवला; दुर्दैवाने एकजण बेपत्ता झाला

## उळे-कासेगावच्या ओढ्यावरील मध्यरात्रीचा थरार

सुराज्य/दक्षिण सोलापूर

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील सोलापूर- तुळजापूर रस्त्यावरील कासेगाव येथील ओढ्याला आलेल्या पुरात तिघेजण मंगळवारी मध्यरात्री वाहून गेले होते. त्यातील दोघेजण सुदैवाने बचावले तर एकजण पुराच्या पाण्यात वाहून गेला. बुधवारी दिवसभार बेपत्ता व्यक्तीचा तपास लागू शकला नाही.**

मुसळधार पावसामुळे उळे-कासेगाव रस्त्यावरील ओढ्याला मोठ्या प्रमाणात पाणी आले होते. तेथील पुलावरही पाणी आले होते. मंगळवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास मोटारसायकलवर बसून जाणाऱ्या तिघांनी ही दुचाकी पाण्यातून नेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पाण्याच्या वेगात त्यांची दुचाकी पुलावरून वाहून गेली. त्या दुचाकीबरोबर हे तिघेही वाहून गेले. यातील बबन संदीपान जाधव (वय-५०) व महादेव रेड्डी (वय-३६ दोघही रा.कासेगाव) हे दोघे ओढ्यातील झाडीझुडपांचा आधार घेवून कसा बसा जीव वाचवला परंतु दुचाकी चालवणारा ज्ञानेश्वर कदम (वय-३५ रा.कासेगाव) हा पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून गेला. हे तिघेही उळे गावावरून कासेगावला चालले होते. बुधवारी सकाळच्या सत्रात जिल्हा प्रशासनामार्फत रेस्क्यू ऑपरेशन करण्यात आले. त्यामध्ये जवळच वाहून गेलेली दुचाकी गाडी सापडली आहे. परंतु बेपत्ता युवकाचा शोध आणखीन सुरू आहे. बुधवारी सायंकाळी अंधारून आल्यानंतर कदम या व्यक्तीची शोध मोहिम थांबवण्यात आली. तंटामुक्त समितीचे अध्यक्ष चंद्रकांत चव्हाण हेही मदतकार्यात व्यस्त होते.







घटनास्थळी खा.प्रणिती शिंदे, आ.सचिन कल्याणशेट्टी, तालुका पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे, तहसीलदार किरण जमदाडे, बोरामणी पंचायत समिती माजी सदस्य धनेश अचलारे, सरपंच यशपाल वाडकर, मुळेगावचे सरपंच विजय राठोड यांनी भेट देऊन पाहणी केली. तर सायंकाळी साडेपाच पर्यंत जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाची टीम व कासेगाव येथील युवक शोध कार्य करीत होते.

वाचा ह्यूमन स्टोरी - पान ३ वर...

### कदम कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर आई अन् लेक पुन्हा झाले पोरके!



ज्ञानेश्वर संभाजी कदम

कदम कुटूंबातील कर्ताधर्ता सर्वात मोठा ज्ञानेश्वर ओढ्यात वाहून गेला. ९ वर्षापूर्वीच घरकर्ते वडील जग सोडून गेले. आई शोभा आणि मुलगा तुकाराम हे पुन्हा पोरके झाले. त्यांच्यावर दुसऱ्यांदा आघात झाला. क्रुरनिती कोपली ती दुसऱ्यांदा! 'त्या' माऊलीच्या नशीबी दु:ख यावं तरी किती?

### कारवाईची ग्रामस्थांची मागणी

मागील दोन-तीन वर्षांपूर्वी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये गंगेवाडी, कासेगाव, उळे उळेवाडी, बक्षी हिपरगा, मुळेगाव तांडा या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून यामध्ये कासेगाव येथील ओढ्याची उंची वाढवण्याऐवजी ती कमी करण्यात आल्यामुळे रस्त्याची खोली ही मोठ्या प्रमाणात झाली होती याबाबत ग्रामस्थांनी वारंवार लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला निवेदन देऊन येथे पुलाची मागणी केली होती. त्यातच ठेकेदार व इंजिनिअरच्या आडमुठ्या धोरणामुळे एक युवक कासेगाव वाहून गेल्यामुळे संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

> पंढरपूरहून एक बोट मागवण्यात आली असून, शोध कार्यासाठी पट्टीचे पोहणारे पाच ते सहाजण जण जॅकेट घालून त्या बुडालेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पाण्यात उतरले पण पाणी जास्त असल्याने त्या व्यक्तीचा शोध लागू शकला नाही. तसेच पाण्यात हुक टाकून देखील त्या व्यक्तीचा शोध घेण्यात आला पण अंधार पडल्याने शोध कार्यात अडथळा येत असल्याने शोध कार्य थांबवण्यात आले.गुरूवारी सकाळी शोधकार्य सुरू होईल.
>
> - **किरण जमदाडे**, तहसीलदार

> जुलै ते ऑगस्टमध्ये या पुलाचे काम सुरू होणार असून त्याची तरतूद झाली आहे तरी नागरिकांनीही आपल्या जीवाची काळजी करून वाहत्या ओढ्याच्या पाण्यातून प्रवास करण्याचे टाळावे.
>
> - **आ.सचिन कल्याणशेट्टी**

> यावर्षी पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून नागरिकांनी ही ओड्यावरून पाणी वाहत असताना प्रवास करण्याचे टाळावे व कासेगाव येथील वाहून गेलेल्या पुलाची संबंधित माहिती मला द्यावी व तो पुल मी त्वरित मंजूर करून देणार..
>
> - **खा.प्रणितीताई शिंदे**



मुसळधार पावसामुळे सीना नदी दुथडी भरुन वाहत आहे.

## सोलापुरात पावसाची विश्रांती; सीना, भोगावती नदीला पूर, ओढे-नाले भरले तुडूंब

**सोलापूर** : शहरात बुधवारी पावसाने विश्रांती घेतली. सकाळी ११ नंतर सूर्यदर्शन झाले. उघडीप मिळाल्याने सोलापूरकरांना उसंत मिळाली. सायंकाळी पुन्हा पावसाळी वातावरण निर्माण झाले मात्र पाऊस आला नाही. मंगळवारी सायंकाळपासून ते बुधवारी सकाळपर्यंत शहरात ५६ मिमि पाऊस पडल्याची नोंद झाली.

दरम्यान, मोहोळ तालुक्यात नरखेड आणि बार्शी तालुक्यात पडलेल्या विजांच्या कडकडाटासह झालेल्या मृग नक्षत्राच्या जोरदार पावसाने झोडपून काढले आहे. परिणामत: नरखेड परिसरातील ओढ्या-नाल्यांना मोठ्या प्रमाणात पाणी आले असून शेतात सर्वत्र पाणी साठून तळ्याचे रूप आले आहे. सीना नदीला मध्यम स्वरूपाचे पाणी आले आहे. तर तुळजापूर व बार्शी तालुक्यात पडलेल्या मृग नक्षत्राच्या पावसाने भोगावती नदी तुडुंब भरून वाहू लागली आहे. भोगावती नदीला यावर्षी दुसऱ्यांदा पाणी आले आहे. यावेळी मात्र पूरसदृश परिस्थीती निर्माण झाली आहे. देगांव (वा), डिकसळ नरखेड, भोयरे, घाटणे, हिंगणी (नि), शिरापूर (सो), लांबोटी आदी गावांजवळून भोगावती नदी दुथडी भरून वाहत आहे.

उद्योग श्रेत्रात राज्याचे पुढचे पाऊल

## जर्मनच्या बाडेन-वुटेनबर्ग सोबत राज्याचा करार

**मुंबई** : महाराष्ट्र आणि जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या राज्यात यांच्यात उद्योग क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ पुरवण्याकरिता झालेला करार हा मानव संसाधन विकास क्षेत्रातील मैलाचा दगड ठरणार आहे.

या करारामुळे दोन्ही राज्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागणार असून भविष्यातील विविध क्षेत्रातील सहकार्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी व्यक्त केला.

युरोपीयन देशांच्या मागणीप्रमाणे त्यांना कुशल मनुष्यबळ पुरविण्याच्या भूमिकेतून महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून कृती गटाची स्थापना करण्यात आली आहे. या कृती गटाच्या पुढाकारातून महाराष्ट्र आणि जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्यात कुशल मनुष्यबळ पुरवण्याबाबत करार फेब्रुवारी २०२४ मध्ये करण्यात आला आहे. या कराराच्या अनुषंगाने सुकाणू समितीची बैठक जर्मनीतील स्टुटगार्ड येथे पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग नोंदवला. त्यावेळी ते बोलत होते. स्टुटगार्ड येथील या बैठकीत महाराष्ट्राचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यासह बाडेन-वुटेनबर्गचे मुख्यमंत्री विनफ्रीड क्रेत्शमन, राज्याचे कुलपती डॉ फ्लोरिअन स्टेगमन, सामाजिक व्यवहार मंत्री मान्ने लुचा, शिक्षण मंत्री थेरेसा स्कॉपर, विज्ञान मंत्री पेट्रा ओल्शोव्स्की, आर्थिक व्यवहार मंत्री डॉ. निकोल हॉफमिस्टर-क्रॉट व इतर मान्यवर सहभागी झाले होते.



यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, भारत आणि जर्मनी यांच्या मध्ये अनेक दशकांपासून द्विपक्षीय संबंध आहेत. महाराष्ट्र आणि वुटेनबर्ग मधील हा सामंजस्य करार या मजबूत भागिदारीचा पुरावा आहे.

## लोकसभेनंतर आता राज्यसभा निवडणुकांची रणधुमाळी

**नवी दिल्ली** : २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर आता सर्वांचे लक्ष राज्यसभा निवडणुकांवर लागले आहे. राज्यसभेचे १० खासदार लोकसभेवर निवडून गेल्यामुळे त्यांच्या रिक्त जागांसाठी लवकरच निवडणूक होणार आहे. राज्यसभा सचिवालयाने सांगितल्यानुसार, यात आसाम, बिहार आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी दोन जागा, हरियाणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि त्रिपुरामधील प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे.

यावेळी लोकसभा निवडणूक जिंकून १० राज्यसभा खासदार लोकसभेत पोहोचले आहेत. त्यामुळे वरिष्ठ सभागृहातील या सदस्यांच्या जागा रिक्त झाल्या आहेत. अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर निवडणूक आयोग आता राज्यांच्या रिक्त जागा भरण्यासाठी निवडणुकांच्या नवीन तारखा जाहीर करेल.

## घरफोडीचे ६ गुन्हे उघडकीस आरोपी जेरबंद

### ३ लाख ९२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत; शहर गुन्हे शाखेची कारवाई

**सोलापूर** : शहर गुन्हे शाखेने वेगवेगळ्या पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणी झालेली घरफोडी चोरीसह चोरींचे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणून, असा एकूण ३ लाख ९२ हजार २९० रूपयेचा मुद्देमाल शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जप्त केला आहे. त्याबाबत आरोपींच्या विरोधात वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



ते आज चर्चा करणार आहेत, असं म्हणाले !

| कल्याण |
| --- |
| 144-90-389 |

| मुंबई |
| --- |
| 469-91-579 |

# फरार डॉक्टर पतीला अनकढाळमध्ये अटक

### महिला आयोगाने घेतली दखल | तपास सीआयडीकडे देण्याची डॉक्टर्स संघटनेची मागणी

सुराज्य/सांगोला

**येथील महिला डॉक्टर ऋचा सूरज रूपनर यांच्या आत्महत्येप्रकरणी फरार झालेला त्यांचा डॉक्टर पती सूरज याला बुधवारी पोलिसांनी अखेर अटक केली. पोलिसांनी त्यास अनकढाळ टोल नाका येथून ताब्यात घेतले. महिला आयोगाने घेतलेली दखल आणि डॉक्टर्स संघटनेचा उठाव यामुळे सदर प्रकरणाकडे झोळेझाक करणारी पोलीस यंत्रणा कामाला लागली**

सूरजच्या अटकेने या प्रकरणाच्या तपासाला आता गती मिळणार आहे. दरम्यान या आत्महत्या प्रकरणाची महिला आयोगाने गंभीर दखल घेतली असून तपासाचा अहवाल आयोगाला देण्याची सूचना आयोगाने ग्रामीण पोलीस दलाला दिली आहे. सासरे उद्योगपती भाऊसाहेब रुपनर यांना मंगळवारीच अटक करण्यात आली. बुधवारी सांगोला येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर उभे केले असता मुख्य आरोपी डॉ. सुरज यास १७ जून व आरोपी भाऊसाहेब यास १४ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायमूर्ती के. बी. सोनवणे यांनी दिला आहे

पंढरपूर येथील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या १०० हून अधिक डॉक्टरांनी सांगोला पोलीस ठाण्यापुढे आरोपीला अटक केल्याशिवाय आम्ही जाणार नाही, अशी भूमिका घेतल्यामुळे पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य




ओळखून सासरे भाऊसाहेब आनंदा रुपनर यांना कोल्हापूर येथे अटक केली. पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे ही माहिती दिली. मंगळवारी रात्री दहा वाजता भाऊसाहेब रुपनर यांना सांगोला पोलीस स्टेशनमध्ये आणल्यानंतर महिला डॉक्टरसह शंभरहून अधिक डॉक्टरांनी पंढरपूरला रवाना झाले ऋचा रुपनर यांनी कौटुंबिक छळाला आणि हिंसाचाराला कंटाळून सांगोल्यात आत्महत्या केली. पती सूरजने केलेल्या छळाला कंटाळून हे टोकाचे पाऊल ऋचा यांनी उचलले.

सांगोल्यातील ज्येष्ठ उद्योजक भाऊसाहेब रूपनर यांच्या सून असलेल्या डॉ. ऋचा (वय ३५) यांनी सांगोल्यात फॅबटेक अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वसाहतीत स्वतःच्या घरात गळफास घेऊन जीवन संपवले होते. त्या आपले पती डॉ. सूरज याच्या सोबत पंढरपुरात फॅबटेक हॉस्पिटल चालवत होत्या. डॉ. ऋचा यांचे बंधू ऋषिकेश संजय पाटील यांनी सांगोला पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्याद दिल्यानंतर सूरज फरार होता. रूग्णालयात त्यास एमआरआय मशिन खरेदी करायची होती. त्यासाठी तो पती डॉ. ऋचा हिच्या मालकी हक्काची असलेली पंढरपुरातील जमीन गहाणखत करून बँककर्ज काढावे किंवा माहेरातून तेवढी रक्कम आणावी म्हणून लकडा लावत असे, असे या फिर्यादीत म्हटले आहे.

### आयोगाने उचलले पाऊल

या प्रकरणाची दखल घेवून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पाऊल उचलले आहे. यापुढील तपास जलदगतीने करत आयोगास अहवाल सादर करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक,सोलापूर यांना त्यांनी दिले. डॉ.ऋचा यांना न्याय मिळवून देण्यासाठी आयोग पाठपुरावा करेल.

### डॉक्टर्स संघटना आक्रमक

बुधवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे हे पंढरपुरात प्रशासकीय बैठकीसाठी आले असता डॉक्टर्स संघटनांनी एकत्र येत त्यांना निवेदन दिले. डॉ. ऋचा पाटील -रुपनर यांची सुसाईड नोट अजून मिळाली नाही,पोलिसांवर राजकीय दबाव असू शकतो,सदर घटनेचा तपास सांगोला पोलीस निरीक्षकाकडून काढून घेत सीआयडीकडे सोपवावा, अशी मागणी यावेळी आयएमए या संघटनेकडून करण्यात आली.